E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# “अंबड मधील मत्स्योदरी देवी संस्थान विषयीच्या कागदपत्रांचा ऐतिहासिक आढावा”

**डॉ. राजाराम माने**

सहायक प्राध्यापक,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड.

ई. मेल: manerajaram8067@gmail.com

**प्रस्तावना :**

जालना जिल्ह्यातील अंबड तालुका हा सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध समजला जातो. समृद्ध मंदिरांनी आणि स्थापत्यानी नटलेला असा हा तालुका आहे. जनजीवनाच्या धार्मिक भावनांचे प्रतिबिंब हे विविध मंदिरातून व्यक्त झालेले आपणास दिसते. विविध देवीदेवतेची मंदिरे तसेच सर्व धर्मियांची मंदिरे येथे आहेत. अंबड शहर व संपूर्ण तालुका याचा विकास होळकर, यादव, निजाम काळात झाला. होळकरांनी येथे बांधलेली मंदिरे व त्यांनीच घालून दिलेला समृद्ध धार्मिक वारसा येथे अजूनही टिकून आहे. कला व स्थापत्य दृष्टीने ही मंदिरे हेमाडपंथी वा यादवकालीन मंदिराची प्रतिबिंबे दिसतात. पण यामध्ये काही स्थानिक वैशिष्ट्यांचा ही समावेश झालेला दिसतो. काही मंदिरे अलीकडच्या काळात बांधलेली आहेत.

मूलतः भारतातील जनतेची धार्मिक प्रवृत्ती समृद्ध राहिलेली आहे. याचीच प्रचिती अंबड मधील सर्व धर्मीयांच्या मंदिरावरून आपणास येते. काळाच्या ओघांमध्ये येथे निर्माण झालेली मंदिरे ही आजही सर्व धर्मसमभाव टिकून आहेत. पुण्यभूमी व धर्मभूमी असलेल्या भारतात आदिशक्ती त्रयस्वरूपी श्री जगदंबा मातेची अनेक पीठे आहेत. आपापल्या स्थानिक अवतार कथा व स्थान महात्म्यामुळे ती प्रसिद्ध आहेत. अशा प्रत्येक ठिकाणी भक्तावर आलेल्या असुरी संकटापासून रक्षण करण्यासाठीच त्या त्या ठिकाणी जगदंबा शक्तीरूपाने प्रकट झालेली आहे.

महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील अंबड येथील श्री मत्स्योदरी देवीचे मंदिर मात्र यास अपवाद आहे. अंबड येथील जगदंबेची स्थान अशा पद्धतीचे आदिशक्तीचे पीठ अथवा उपपीठ नाही. या ठिकाणी त्रयीस्वरूपी जगतजननी ही केवळ भक्तांसाठी त्यास आपले अखंड स्थान्निद्य लाभावे म्हणून प्रकट झालेली आहे, अशी जनमानसातील श्रद्धा आहे. येथील स्थान महात्म्य, भक्ती महात्मे जगदंबेच्या भक्त, साधकांना निरनिराळ्या प्रसंगांमधून घडलेली अनुभूती दर्शन, मंदिराचा निसर्गरम्य परिसर व

मंदिराची भव्य कलाकृती यामुळे हे स्थान केवळ वैशिष्ट्यपूर्णच नव्हे तर रमणीय व जगदंबेच्या चरणी दर्शनार्थीच्या मनामध्ये सहज रूपाने श्रद्धा भाव निर्माण करणारे आहे.

भक्तांची भावपूर्ण भक्ती व दास्यत्व भाव पाहूनच येथे त्रयस्वरूपी जगदंबेने वास केलेला आहे. या मंदिराची स्थापना होळकर काळात 18 व्या शतकात झाली आहे.

## मत्स्योदरी देवी संस्थान विषयीच्या कागदपत्रांचा ऐतिहासिक आढावा:

मध्ययुगीन काळातील उपलब्ध कागदपत्रांमध्ये अंबडची नोंद 'कसबा' म्हणून येते. पण पेशवे, होळकर आणि निजाम दप्तरात मात्र 'परगणे अंबड' असा उल्लेख आढळतो. अंबड परगणा हा होळकरांचा खाजगी दौलतीचा भाग होता. खाजगी दौलत हा पेशव्याकडून मल्हाररावांना मिळालेला एक विशेष अधिकार होय. हा अधिकार इसवी सन 1734 ला मिळाला असला तरी या भागात होळकरांचा अधिकार पूर्वीपासूनच चालत असावा असे अंबड येथील साखरे घराण्यातील एका निवाडा पत्रावरून कळते.

श्रीमंत अहिल्याबाई होळकर यांनी अनेक देवस्थानांना जहागीर वा इनाम जमिनी दिल्या. त्यांनी धार्मिक संस्थांने स्वयंपूर्ण कशी होतील याकडे विशेष लक्ष पुरविले. अंबड येथील श्री मत्स्योदरी देवी संस्थान हे सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा 1950 अन्वये नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्रमांक 1400 औरंगाबाद दिनांक 13/08/1964 हा असून त्यात पदसिद्ध तहसीलदार हे मुख्य विश्वस्त असून नायब तहसीलदार (राजस्व) हे पदसिद्ध म्हणून नोंदविलेले आहेत. संस्थानाचे वंशपरंपरागत पुजारी श्री सखारामपंत कुंठेफळकर हे आहेत. श्रीमंत अहिल्याबाई होळकरांच्या मृत्यूनंतर म्हणजे 13 ऑगस्ट 1795 नंतर तुकोजी होळकर यांची अंबड येथील विविध कागदपत्रांमध्ये नोंद मिळते. साखरे घराणातील कागदपत्रावरून असे दिसते की परगणे अंबड नगराची पाटीलकी महिपतराव हैबराव खरात यांच्याकडे होती. पण पुढे तो एका भांडणामध्ये मारला गेल्याने ही पाटीलकी ताबाजी हेमाजी साखरे यांच्याकडे आली. खरात हे होळकरांचे सोयरे होते, अशी नोंद मिळते.

अंबड येथील देवस्थानाच्या व गावांच्या विकासाला वरील नाते कारणीभूत ठरले असले तरी संपूर्ण परगाण्याचा महसूल गोळा करणे व व्यवस्था पाण्याचा अधिकार मात्र देशमुख व देशपांडे घराण्याकडे होता. श्री मत्स्योदरी देवी या ग्रामदेवतेच्या मुख्य उपासकात हीच मंडळी प्रामुख्याने होती. या संदर्भात 11 डिसेंबर 1779 चे पत्र बोलके आहे. यात देवीच्या संदर्भाती वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख मिळतो. श्री मत्स्योदरी संस्थानाच्या संदर्भात 19 डिसेंबर 1776 चे असेच एक महत्त्वाचे पत्र तुकोजी होळकरांच्या शिक्क्याचे आहे. देवीच्या चरणावर रोज फुले वाहिली जावी अशी तरतूद या पत्रातून केली

गेली. श्रीपाद मैराळ देशाकडील भारनेर महालाचा मामलेदार असून त्याने अंबडच्या राजश्री महिपतराव यांना या संदर्भात इसवी सन 1776 ला एक पत्र लिहिले. या पत्रात नोंद मिळते की महादजी यादव याला श्रीदेवीचा बाग सरकारातून मिळाला आहे. तेव्हा या बागेची वहिवाट त्यांच्याकडेच राहिली पाहिजे. यास धोंडोपंत फडणीस अडथळा आणतील तेव्हा याकडे तुम्ही विशेष लक्ष द्यावे. हे पत्र यास लिहिण्याचे कारण म्हणजे ते यावेळी अंबडचे पाटील असून ते या पत्रावरून श्रीपाद मौराळ हे होळकरांचे सोयरे असल्याचे दिसते.

5 जुलै 1783 च्या एका पत्रात तुकोजी होळकर यांनी अंबडच्या देशमुख यांना स्पष्ट आदेश दिला की, महाराव यादव याला दरवार्षिक एक रुपयाप्रमाणे वर्षासन ठरवून दिले आहे, ते योग्य आहे. तेथे श्रीदेवी आहे, तिची पूजा आजच्या यथास्थितीत करून द्यावी. ब्राह्मणास ते आदर सत्कार करतात तेव्हा याविषयीचे वर्षासन चालेल असे पहावे या कराराचा धर्मपत्र असा उल्लेख केला आहे. या आशयाचे हे पत्र आहे. अहिल्याबाईच्या प्रत्येक प्रांताचे उत्पन्न पाहता परगाणा अंबड प्रांत गंगथडीचे उत्पन्न तीन लाख असा उल्लेख असून अंबड परगण्यात 237 गावे होती. त्यापैकी 218 गावांचे उत्पन्न होळकरांना मिळत होते. तेव्हा महादजी यादव याला मिळणारे वर्षासन दर गाव एक रुपया याप्रमाणे 218 रुपये होते असे दिसते. इसवी सन 1784 च्या एका पत्रात औंढा नागनाथ येथील देवस्थानाची पूजा व इतर खर्चासाठी म्हणून अंबड पारगण्यातून काही रक्कम देण्याचे ठरवून दिले आहे अशी नोंद मिळते. काशीराव होळकर यांच्या सनदाही मत्स्योदरी संस्थानाबाबत मिळतात. इ. स. 1798 मधील एका पत्रात अंबिका देवीच्या नगरखान्याचा हिशोब आलेला आहे. वरील सर्व पत्रा वरून असे दिसते की, होळकरांच्या खाजगी दौलतीचा भाग असलेला अंबड परगाना हा संपन्न होता. याच्या उत्पन्नातून त्यांनी अनेक ठिकाणी वर्षासने नियमितवेळी दिली होती.

विविध स्थित्यंतर होऊन सुद्धा श्रीमंत अहिल्याबाईंनी दिलेल्या वर्षांसन व इनाम जमिनीमुळे श्री मत्स्योदरी देवी संस्थान हे उत्तरोत्तर वृद्धिंगत होत राहिले. दि. 14 ऑक्टोबर 1823 च्या एका पत्रात नवरात्र उत्साहात बसलेल्या ब्राह्मण घराण्याची नोंद मिळते. तसेच इसवी सन १८३४ च्या एका पत्रात होम हवन, अनुष्ठान इत्यादी पित्यर्थ केलेल्या खर्चाची नोंद मिळते. आजपर्यंत सेवा करणारी अनेक घरांणी आजही या उत्साहात भाग घेताना दिसतात.

## सारांश:-

वरील प्रमाणे अंबड मधील समृद्ध अश्या मत्स्योदरी देवी संस्थानच्या कागदपत्रांच्या आधारे असे आपण म्हणू शकतो की, अंबड मधील हे संस्थान 16/17 शतकापासून चालू असून मंदिराच्या

विकासाच्या दृष्टीने संस्थानांने अनेक नवनवीन उपक्रम आज हाती घेतलेले आपणास दिसतात. आज हे मंदिर संस्थान पर्यटन विकास अंतर्गत आलेले असून मंदिराच्या सुशोभीकरण व विस्तारासाठी विशेष प्रयत्न झालेले आपणास दिसतात. यामुळे या मंदिर संस्थानाच्या विकासाला गती लाभलेली आहे.

## संदर्भ ग्रंथ:-


1) गोसावी मधुकर, श्री मत्स्योदरी देवी महिमा, श्री ऑफसेट प्रिंटर्स औरंगाबाद, शके 1927
2) ओझा लक्ष्मीकांत, श्री मत्स्योदरी देवी अंबड, प्रिटींग प्रेस औरंगाबाद, शके 1920
3) पारसनीस द. ब., अहिल्याबाई चरित्राचे सत्य स्वरूप, विविध ज्ञानविस्तार मुंबई, 1907
4) डॉ. कठारे, डॉ. नगराळे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड,1999
5) पाठक अ. शं., अंबड परंपरा आणि इतिहास, स्मरणिका अंबड, 1982
6) शर्मा उदयभानू, लोकमाता अहिल्या, अहिल्या प्रकाशन इंदोर, 1965